**महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित**

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई-४०००६५

---

**शासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी करार पध्दतीने मुलाखतीद्वारे भरणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| १ | **कार्यालयाचे नाव** | महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित. गोरेगांव (पू.), मुंबई - ६५ |
| २ | **पदनाम व पदसंख्या** | १) मुख्य प्रशासकीय अधिकारी - १ पद<br>२) उप अभियंता (स्थापत्य) - १ पद<br>३) व्यवस्थापक कलागारे - १ पद |
| ३ | **पदाचे स्वरुप व कालावधी** | करार पध्दतीने १ वर्ष. |
| ४ | **सविस्तर जाहिरात व अर्ज उपलब्धतेचे ठिकाण** | **www.filmcitymumbai.org** **व** **www.maharashtra.gov.in** |
| ५ | **अर्ज पाठविण्याचे ठिकाण** | filmcitycao@gmail.com |
| ६ | **अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक** | दि.२४.०३.२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ७ | **निवड पध्दत** | मुलाखतीद्वारे |

अर्जाचा नमुना, पदाची अर्हता, अनुभव, अटी शर्ती यांचा तपशील **www.filmcitymumbai.org व www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संकेत स्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातच अर्ज सादर करावा, अन्यथा आपल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरी
व्यवस्थापकीय संचालक
म.चि.र.व सां.वि.म. मर्यादित

# महाराष्ट्र चित्रपट,रंगभमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०० ०६५.

---

## शासकीय सेवेतील सेवा निवृत्त अधिकारी करार पध्दतीने भरण्याकरिता जाहिरात.

महामंडळाचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालण्यासाठी शासनाने शासन निर्णय क्र.गोचिन-२००९/प्र.क्र.१११/सां.का.१, दि.३०.०९.२००९ अन्वये २४९ पदांचा आकृतिबंध मंजूर केला आहे. यापैकी १८ पदे व्यपगत झाल्याने २३१ पदे मंजूर असून सद्यस्थितीत विविध सवंर्गातील फक्त ७२ पदे कार्यरत असून १५९ पदे रिक्त आहेत. कार्यरत पदांमध्ये बहुतांश कर्मचारी चतुर्थ श्रेणीतील व तांत्रिक  स्वरुपाचे काम करणारे आहेत. तसेच कार्यरत असलेल्या कर्मचारी नियतवयोमानुसार सेवा निवृत्त होत असल्याने दैनंदिन कार्यालयीन कामकाज करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी पडत आहे.

महामंडळातील सद्यास्थितीतील कामाचे स्वरुप व कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेवून घेवून सरळसेवेने भरती होईपर्यंत किंवा आवश्यतेनुसार शासकीय सेवेतील निवृत्त अधिकारी प्रथम १ वर्षाच्या कालावधीसाठी सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ अटी व शर्तीच्या अधिन राहुन मुलाखतीद्वारे करार पद्धतीने भरण्यासाठी खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे:-

| अ.क्र | पदाचे नाव | संख्या | अर्ज करण्यास अर्हता | कामकाजाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | मुख्य प्रशासकीय अधिकारी | १ | सेवा निवृत्त - अवर सचिव / उप जिल्हाधिकारी | महामंडळातील दैनंदिन प्रशासकीय कामकाज, सुधारीत  पदांचा आढावा, सेवा शर्ती नियम, अनुकंपा, बिंदूनियमावली, आश्वासित प्रगती योजना, सरळसेवा, पदोन्नती इ. कामात सुसुत्रता आणणे व वरिष्ठांनी वेळोवेळी सुचविले काम. |
| २ | उप अभियंता (स्थापत्य) | १ | सेवा निवृत्त - उप अभियंता (स्थापत्य) | महामंडळात विविध प्रकल्प व चित्रनगरीचा सर्वांगिन विकास करणे, रस्ते, बाग बगीचे, चित्रीकरणासाठी नवीन चित्रीकरण स्थळे व कलागारे निर्माण करणे, अतिक्रमण रोखण्यास उपाय योजना करणे इ. काम. वरिष्ठांनी वेळोवेळी सुचविले काम. |
| ३ | व्यवस्थापक कलागारे | १ | सेवा निवृत्त - अवर सचिव/ तहसिलदार | कलागारे विभागातील आरक्षण नियंत्रण करणे व्यवसाय वाढीसाठी प्रयत्न करणे, निर्मीती संस्थांच्या अडीअडचणी सोडविणे तसेच नवीन चित्रीकरण स्थळे विकसीत करण्यास आवश्यकतेनुसार प्रस्ताव सादर करणे. नियमित देयकांची वसूली करणे व मागील थकबाकी वसूली करणे अतिक्रमण रोखण्यास उपाय योजना करणे इ. वरिष्ठांनी वेळोवेळी सुचविले कामे. |

**२. अर्हता** :- अ) शासन सेवेतील जानेवारी २०१९ ते फेब्रवारी २०२२ या कालावधीत सेवा निवृत्त झालेले अधिकारी.

ब) शारिरीक व बौध्दिकदृष्ट्या कार्यक्षम असणे आवश्यक.

क) मराठी, हिंदी आणि इंग्रजी लिहिण्या व वाचण्याची क्षमता आवश्यक.

ड) कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी झालेली, प्रलंबित अथवा प्रस्तावित नसावी.

**३. वित्तलब्धी** :- सेवानिवृत्ती पुर्वीचे वेतनातून सद्यस्थितीत प्राप्त होणारे निवृत्तीवेतन वजा करून  शिल्लक रहाणारी रक्कम इतके वेतनमान देय राहील.

**४. पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-** वरील सर्व पदांच्या जबाबदाऱ्या तक्त्यात अ.क्र.५ मध्ये नमूद करण्यात आले आहे.

५. अर्जाचा नमुना व इतर अनुषंगीक बाबी महामंडळाच्या **www.filmcitymumbai.org** व **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

वरील अर्हता धारण करण्याऱ्या उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, अनुभव वयाच्या पुराव्याबाबतची कागदपत्रे, सेवेत असताना सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेल्या पदाच्या पुराव्यार्थ आवश्यक त्या (उदा. सेवा निवृत्ती वेळेचे वेतन प्रमाणपत्र व निवृत्ती वेतन प्रमाणपत्र) साक्षांकित कागदपत्रासह विहीत नमुन्यात खालील पत्यावर डाकद्वारे किंवा filmcitycao@gmail.com या इमेल आयडीवर ऑन लाईन दि.२४.०३.२०२२ सायंकाळी ५ वाजे पर्यंत अर्ज पोहचेल असा करावा.

**महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित,**
**दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५.**

प्राप्त होणाऱ्या अर्जांची संख्या विचारात घेऊन त्यानुसार छाननी करुन पात्र उमेदवारांपैकी उमेदवारांचा अनुभव व वयोमर्यादा विचारात घेऊन सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व हक्क महामंडळ राखून ठेवत आहेत. मुलाखतीचा दिनांक व वेळ पात्र उमेदारांना यथावकाश कळविण्यात येईल.

स्वाक्षरी,
व्यवस्थापकीय संचालक
म.चि.र.व सां.वि.म. मर्यादित

# अर्जाचा नमुना

शासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी करार पध्दतीने मुलाखतीद्वारे भरण्याबाबतचा अर्जाचा नमुना :-

| | | |
|---|---|---|
| १ | **अर्जदाराचे नांव** | |
| २ | **अर्ज करत असलेल्या पदाचे नाव** | |
| ३ | **जन्म तारीख** | |
| ४ | **पत्रव्यवहारासाठीचा पत्ता** | |
| ५ | **ई- मेल** | |
| ६ | **दूरध्वनी / मोबाईल क्रमांक** | |
| ७ | **शैक्षणिक अर्हता** | |
| ८ | **सेवा निवृत्ती दिनांक व सेवा कालावधी** | |
| ९ | **निवृत्तीच्यावेळी कार्यरत असलेल्या कार्यालयाचा तपशील व कालावधी** | |
| १० | **सेवा निवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद** | |
| ११ | **विभागीय चौकशी झालेली / प्रस्तावित / प्रलंबित आहे किंवा कसे याचा तपशिल** | |
| १२ | **सेवा निवृत्ती वेळेचे वेतन प्रमाणपत्र व निवृत्ती वेतन मिळत असल्यास निवृत्ती वेतन प्रमाणपत्र** | |

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी